**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र: व.वि.श.म./ / /२५-२६**
**दिनांक : 13/08/2025**

# वसई विरार शहर महानगरपालिका

## क्रीडा विभाग

### दि.०७ डिसेंबर २०२५ रोजी होणार १३ वी वसई विरार शहर महानगरपालिका मॅरेथॉन

दिनांक १३/०८/२०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालयात मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी यांचे अध्यक्षतेखाली "१३ वी वसई विरार शहर महानगरपालिका मॅरेथॉन" स्पर्धा आयोजित करणेबाबत बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीत मा.आयुक्त महोदयांच्या सूचनेनुसार वसई विरार शहर महानगरपालिका १३ वी मॅरेथॉन स्पर्धा ही दिनांक ०७/१२/२०२५ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले. सदर मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभाग घेणारे धावपट्टू यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन साठी पुढील प्रकिया करण्याची सूचना मा.आयुक्त महोदयांनी संबंधित विभागाला दिली. महानगर पालिकेची १३ वी मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी व दर्जेदार होण्याकरिता योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना यावेळी मा.आयुक्त महोदयांनी दिल्या.

सदर बैठकीत मा. आयुक्त श्री. मनोजकुमार सूर्यवंशी, मा. अतिरिक्त आयुक्त श्री. संजय हेरवाडे, मा.अतिरिक्त आयुक्त श्री. दिपक सावंत, मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. इंद्रजीत गोरे, मा. उपआयुक्त श्री. दिपक झिंजाड, मा. उपआयुक्त श्रीम.अर्चना दिवे, मा. उपआयुक्त श्रीम. स्वाती देशपांडे, प्र.शहर अभियंता श्री. प्रदीप पाचंगे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.भक्ती चौधरी, क्रीडा विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. व्हिक्टर डिसोझा, गत वर्षीचे मॅरेथॉन इव्हेंट व्यवस्थापक श्री. ब्रुनो गोवेश तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.